# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**राज्यात दुष्काळामुळे सुमारे चार लाख हेक्टर क्षेत्रावरील पिके पुर्णत: वाया गेलेल्या शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत करण्याबाबत**

**(१) ३०००४ (१६-०१-२०१६). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळामुळे सुमारे चार लाख हेक्टर क्षेत्रावरील पिके पुर्णत:वाया गेली असून तेथे दुबार पेरणी अशक्य आहे शिवाय हे क्षेत्र रब्बी पिकाचे क्षेत्र नसल्याने त्यावर यंदा कुठलेच पीक घेता येणार नसल्याचे माहे ऑगस्ट २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास,पीके पुर्णत: वाया गेलेल्या शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०७-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एससीवाय-२०१५/प्र.क्र.३११/म-७, दि. २० ऑक्टोबर, २०१५ अन्वये खरीप २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या असून राज्यातील बाधीत झालेल्या १४७४७ गावातील खातेदारांना कृषि विषयक मदत वाटप करण्याकरिता निविष्ठा अनुदानाकरीता एकुण रू.४७०६.८६ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**राज्यातील पिकांची आणेवारी निश्चत करण्याबाबत**

**(२) ३०४७७ (१८-०१-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सध्या प्रचलित असलेली ब्रिटीशकालीन पीक पैसेवारीची पध्दत बंद करुन नवीन पध्दतीनुसार राज्यातील पिकांची आणेवारी निश्चत करण्याची मा.कृषीमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती शासनाने नियुक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालात समितीने कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(४) असल्यास, उक्त शिफारशीवर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(५) असल्यास, समितीने आपला अहवाल शासनाला सादर करण्याबाबत तसेच शिफारशीवर निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यकाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०७-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती.

(२), (३), (४) व (५) विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने त्यांचा सविस्तर अहवाल दिनांक २३.७.२०१५ रोजी शासनास सादर केला. समितीच्या अहवालावर मंत्रीमंडळ उपसमिती व मंत्रिमंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन पीक पैसेवारीबाबत समितीच्या अहवालातील शिफारशी स्विकारून पिक पैसेवारीबाबत सर्वसमावेशक शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१३/प्र.क्र.२०७/म-७ दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१५ निर्गमित करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा दुष्काळी जिल्हा म्हणून जाहीर करणेबाबत**

**(३) ३५४५१ (२०-०१-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार जून ते सप्टेबर दरम्यान राज्यामध्ये सर्वाधिक कमी पावसाची नोंद कोल्हापूर जिल्हयात झाली असून कोल्हापूर जिल्हयामध्ये फक्त ६३५ मि.मि. पाऊस पडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागाने जिल्ह्यातील गावाची पहाणी करून दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, एकूण सरासरीच्या केवळ ३७ टक्के इतका कमी पाऊस होऊनही कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शासनाने दुष्काळ जाहीर केलेला नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन याबाबत फेरसर्व्हे करून कोल्हापूर जिल्हा दुष्काळी जिल्हा म्हणून जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार कमी पाऊसाबरोबर दुष्काळ किंवा दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यासाठी आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

सन २०१५-१६ मध्ये कोल्हापूर जिल्ह्याची पिक पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा जास्त असल्याने दुष्काळ सदृश्य परिस्थिती नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या परिवहन विभागामधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेंशन मिळणेबाबत**

**(४) ३५९५० (३०-०१-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या परिवहन विभागामधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेंशन मिळणेबाबत प्रदिर्घ कालावधीपासून सुरु असणाऱ्या मागणीवर औरंगाबाद खंडपीठाने निर्णय दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर माणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) महाराष्ट्र राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी असोशिएशन, महाराष्ट्र यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठासमोर याचिका दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी सदरची याचिका निकाली काढली आहे.

तद्नंतर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन लागू करण्यासाठी "निवृत्ती वेतन योजना सोलापूर पॅटर्न - २००६" योजनेसंदर्भात विचारविनिमय करण्यात आला. परंतु, राज्य

परिवहन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या सर्व लाभांच्या रकमा घेतल्या आहेत. त्यामुळे महामंडळावर कोणत्याही स्वरुपाचा आर्थिक भार न पडता नविन निवृत्ती वेतन योजना राबविण्यासाठी निधीची उपलब्धता होत नाही. या योजनेनुसार राज्य परिवहन कर्मचाऱ्यांची जमा रक्कम भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून सहजासहजी मिळणे शक्य नाही, या सर्व बाबी विचारात घेऊन सदरची निवृत्ती वेतन योजना कार्यान्वित करणे व्यवहार्य होणार नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात विनापरवाना प्रवासी वाहतूक करण्यास असलेला निर्बंध**

**(५) ४६२९४ (१५-०५-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात विनापरवाना प्रवासी वाहतूक करण्यास निर्बंध आहेत, हे खरे आहे काय,

(२) असे असतांनाही कोल्हापूर जिल्ह्यात एसटी बस स्थानकांतून अवैध खाजगी प्रवासी वाहतूक वाहनांची माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, किती वाहनांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत व त्यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या कोल्हापूर विभागीय कार्यालय यांचेमार्फत माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवडयापर्यंत कोल्हापूर बसस्थानकातून अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या २८५३ वाहनांच्या नोंदी, तसेच कोल्हापूर विभागातील सर्व आगारांच्या नोंदी संकलित करुन पोलीस, शहर वाहतुक नियंत्रण शाखा, पोलीस अधिक्षक आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर यांना देण्यात आलेल्या आहेत.

एप्रिल-२०१५ ते ऑक्टोबर-२०१६ या कालावधीत अवैध प्रवासी वाहतूकीवर कारवाई करण्याकरिता प्रादेशिक परिवहन व राज्य परिवहन महामंडळाद्वारे तयार करण्यात आलेल्या पथकाद्वारे महामंडळाच्या बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरातील अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या एकूण ११७ दोषी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच, कोल्हापूर जिल्हयातील एकूण ३२६० अवैध वाहतूक करण्याऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

अवैध प्रवासी वाहतूकीस आळा घालण्याकरीता शासनाने दिनांक १४.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हा परिषदेच्या विशेष घटक योजने अंतर्गत बैलजोडी वाटप योजनेबाबत**

**(६) ४७८२८ (०५-०५-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हा हा शेतकरी आत्महत्या ग्रस्त जिल्हा घोषित असून जिल्हा परिषदेचे विशेष घटक योजने अंतर्गत पंचायत समितीच्या कृषी विभागाने २०१३-१४ या आर्थिक वर्षात विशेष घटक योजने अंतर्गत बैलजोडीचे वाटप योजनेत तब्बल २३ लाखाचा अपहार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेष घटक योजनेतून पंचायत समिती २०१३-१४ या आर्थिक वर्षात वाई-रूई येथील शेतक-यांना बैलजोडी योजनेचा लाभ श्री.जितेंद्र कांबळे व श्री.महेंद्र विठ्ठल मेश्राम यांना देण्यात आला पंरतू सदर व्यक्तीं हे वाई-रूई येथे अस्तिवात राहत नसल्याबाबतचे पत्र तेथील तलाठयांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुई-वाई येथील शेतक-यांचे नावे प्रत्येकी ३० हजार कागदोपत्री दाखवून सदर रक्कमेची उचलही करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी यवतमाळ तक्रार देवून अद्याप पर्यंत कुठल्याही स्वरुपाची कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (३१-०७-२०१७) :**(१) नाही.
(२) सन २०१३-१४ या वर्षात बैलजोडीचा लाभ दिलेले श्री.जितेंद्र कांबळे हे वाकी व श्री.महेंद्र विठ्ठल मेश्राम हे वाई हातोळा रोड येथील रहिवाशी आहेत. याबाबत ग्रामपंचायत सचिवाचा रहिवाशाचा दाखला, जमिनीचा ७/१२ नमुना व ८अ हे पुरावे उपलब्ध आहेत.
(३) अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.
(४) जिल्हाधिकारी, यवतमाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्याकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एसटीकडून पुणे स्टेशन बस स्थानकावर प्रवाश्यांच्या सुरक्षिततेविषयी उपाययोजना नसल्याबाबत**

**(७) ५४१३३ (२४-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटीकडून पुणे स्टेशन बस स्थानकावर प्रवाश्यांच्या सुरक्षिततेविषयी उपाययोजना नसल्याची बाब माहे मे, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या काही दिवसांपासून पुणे स्थानकाच्या परिसरात लुटमारीच्या घटना घडल्या असून अवैध वाहतुकीचे प्रमाण मोठ्याप्रमाणात असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) नाही.
(२) पुणे बसस्थानकाच्या परिसरात लुटमारीच्या घटना घडलेल्या नसून, अवैधरित्या वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) पुणे रेल्वे स्टेशन बसस्थानकावरील वाहतूक नियंत्रक, स्थानक प्रमुख ध्वनीक्षेपकावरुन प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत वारंवार सूचना देतात. बसस्थानकावर पोलीस कक्षासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पोलीसांमार्फत बसस्थानकावर वेळोवेळी राऊंड घेवून तपासणी केली जाते.

राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात खाजगी वाहने उभी करण्यात येवू नये, असे आदेश पारित करण्यात आलेले असून, सदर आदेशाच्या अनुषंगाने सर्व आगारांच्या व बसस्थानकांच्या परिसरात २०० मीटर "नो पार्किंग झोन" चे फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच आगार कार्यक्षेत्रात होणा-या अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे प्रकार व वाहन क्रमांक यांची दैनंदिन माहिती संबंधित पोलीस ठाणे यांना पत्राद्वारे देण्याची कार्यवाही राज्य परिवहन महामंडळाद्वारे करण्यात येते.

अवैध प्रवासी वाहतूकीस आळा घालण्याकरीता शासनाने दि.१४.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाली सुधागड (जि.रायगड) येथील राज्य परिवहन बस स्थानकामधील गैरसोईबाबत**

**(८) ५४९५२ (२४-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाली सुधागड (जि.रायगड) येथील राज्य परिवहन मंडळाच्या पेण आगारा अंतर्गत येणारे व अष्टविनायकांपैकी तीर्थक्षेत्र असलेले पाली हे बस स्थानक कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बस स्थानकाच्या आवारात अनधिकृत पार्कींग मोठया प्रमाणात होत असल्याने प्रवाशासह एस.टी.चे वाहतूक नियंत्रक, चालक व वाहक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बस स्थानकाच्या परिसरात सुलभ शौचालय आहे, शौचालयाच्या स्वच्छतेसाठी ग्राहकांकडून प्रत्येकी ३ रूपये घेतले जात असूनही स्वच्छता गृहामध्ये दुर्गंधी पसरलेली आहे, हे खरे आहे काय,
(४) बस स्थानकाचे इमारतीची पूर्णपणे दुरवस्था झाली असून, इमारतीचा काही भाग कोणत्याही क्षणी प्रवाशांच्या अंगावर कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास,या सर्व समस्यांची चौकशीकरुन शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) होय.
(२), (३), (४), (५) व (६) पाली बसस्थानकाच्या आवारात होत असलेल्या अनधिकृत पार्किंग बाबत पोलीस निरीक्षक, पाली पोलीस स्टेशन, पाली, ता.सुधागड यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच अनधिकृत पार्किंग हटविणेबाबत दोन वाहतूक नियंत्रक कार्यरत आहेत.

आगाराच्या देखरेखीखाली शौचालयाची दैनंदिन साफसफाई करुन घेतली जाते.

बसस्थानकाची इमारत जुनी झाली असल्याने छताचे व भिंतीचे निघालेले प्लॉस्टर काढून घेतलेले आहे. त्यामुळे इमारतीचा कोणताही भाग पडण्याची परिस्थिती नाही. सदर इमारत नुतनीकरणाची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

---

**पन्हाळगड (जि.कोल्हापूर) येथे सुसज्ज बस स्थानक नसलेबाबत**

**(९) ५८५१५ (२४-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पन्हाळगड (जि.कोल्हापूर) हे एक ऐतिहासिक ठिकाण असून दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात तरी सदर ठिकाणी एस.टी महामंडळाची प्रशस्त अशी जागा असूनही येथील बस स्थानक अत्यंत छोट्याश्या जागेत सुरु आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर छोट्या बस स्थानकात प्रवाशी, वाहक तसेच चालकांसाठी लागणाऱ्या मुलभूत सुविधा नसल्याने अत्यंत गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बस स्थानक सुसज्ज करणेकारिता तसेच प्रवाशी, वाहक चालकांसाठी लागणाऱ्या मुलभूत सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१), (२) व (३) पन्हाळा येथे प्रवाशांचे सोयीकरीता सुसज्ज असे बसस्थानक बांधणेकरीता राज्य परिवहन महामंडळातील ६४५० स्क्वे.मी.इतकी जागा दि.३.८.२०१६ रोजी ताब्यात घेण्यात आली आहे. सदर जागेमध्ये प्रवाशांचे सोयी करीता व चालक/वाहक यांना मुलभूत सुविधा देण्यासाठी अद्ययावत बसस्थानक बांधण्याचे राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र एसटी महामंडळातील कर्मचा-यांच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(१०) ५८७४३ (२५-०८-२०१६). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र एसटी महामंडळातील कर्मचारी प्रतिकूल परिस्थितीत काम करत असून आपल्या न्याय मागण्यांवर निर्णय घेतला जावा याकरिता कर्मचाऱ्यांनी यापूर्वी अनेक वेळा काम बंद केलेले होते, तसेच समस्या सोडविण्यासाठी जानेवारी, २०१६ च्या तिस-या आठवड्यात तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.परिवहन मंत्री यांचेकडे निवेदने सादर केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी एसटी कर्मचा-यांनी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी एसटी कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) होय, निवेदने सादर केली आहेत.

(२) व (३) • सन २०१२-२०१६ चा कामगार करार रद्द करावा व २०१२-२०१६ या कालावधीत २५% पगारवाढ देण्यात यावी.

• एस.टी.कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करावा.

• एस.टी. कर्मचाऱ्यांना “राज्य शासनात विलीन करावे”.

अशा मागण्या राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांनी केल्या आहेत. यापैकी कोणतीही मागणी मान्य करता येणार नाही, असे या अगोदरच लेखी कळविण्यात आले आहे.

एस.टी. कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीबाबत राज्य परिवहन महामंडळाद्वारे दिनांक ३०.०७.२०१६ रोजीच्या आदेशांन्वये “वेतनश्रेणी अभ्यास गट” स्थापन करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात एप्रिल आणि मे महिन्यातील सलग तीनवेळा डिझेल दरवाढीमुळे एसटीला वर्षाला १८० कोटींचे नुकसान होणार असल्याबाबत**

**(११) ६००४५ (२४-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एप्रिल आणि मे महिन्यातील सलग तीनवेळा डिझेल दरवाढीमुळे एसटीला वर्षाला १८० कोटींचे नुकसान होणार असल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती एसटी ला शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) होय.

एप्रिल, २०१६ ते मे, २०१६ या कालावधीत तीन वेळा डिझेलची दरवाढ झाली व एक वेळ घट झाली. माहे एप्रिल, २०१६ ते ०८ फेब्रुवारी, २०१७ पर्यंत १५७.५० कोटी डिझेल खर्चात वाढ झालेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एसटी महामंडळाच्या बस स्थानके तसेच एसटी बसेस वरील जाहिरातीचे कंत्राट गेल्या ३५ वर्षापासून एकाच कंपनीकडे असल्याची चौकशी करण्याबाबत**

**(१२) ६०५१५ (२४-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाच्या बस स्थानके तसेच एसटी बसेस वरील जाहिरातीचे कंत्राट गेल्या ३५ वर्षापासून एकाच कंपनीकडे असल्याने त्याची चौकशी करून निकोप ई टेंडर करण्याबाबतचे निवेदन मा.परिवहन मंत्री यांना जून, २०१६ वा त्या दरम्यान लोकप्रतिनिधी यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०८-२०१७) :**(१) नाही.

(२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत जाहिरातींकरिता मागविण्यात येणाऱ्या निविदा या शासनाने निश्चित केलेल्या ई-निविदा कार्यपध्दतीनेच मागविण्यात येतात. त्या अनुषंगाने बसस्थानके तसेच, एस.टी. बसेसवरील जाहिरातीकरीता नव्याने निविदाप्रक्रीया

राबविण्यात आली असून, सदर निविदेची कायदेशीर प्रक्रिया पार पाडल्यानंतर, त्यात बसस्थानकावरील जाहिरातीकरीता डी ओम ॲडव्हरटायजींग, तर बसवरील जाहिरातीकरीता राकेस ॲडव्हरटायजींग या नवीन दोन कंपन्यांची निवड करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर येथे दुष्काळात जनावरांच्या छावणी चालकांच्या अनुदानात कपात न करण्याबाबत**

**(१३) ६२५७२ (१६-०८-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथे दुष्काळात जनावरांच्या छावण्या चालविण्यासाठी अर्ज मागवणे व प्रक्रिया राबविण्यात वेळ जात असल्याने छावण्या सुरु होण्यास विलंब होत आहे त्यामुळे शासनानेच छावण्या मंजूर करुन स्वत: चालवाव्यात असा ठराव झेडपीच्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने केला असल्याने माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील जनावरांच्या छावण्यांतील शेणाचे पैसे कपात करुन छावणी चालकांना अनुदान दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ नुसार सदर ठरावाच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) असल्यास, प्रश्न भाग ३ नुसार छावणी चालकांच्या अनुदानात कपात न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०७-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) व (४) शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट, २०१५ मधील अटींच्या अधीन राहून अहमदनगर जिल्ह्यात आवश्यक असेल त्या ठिकाणी चारा छावण्या सुरू करण्यास शासन पत्र दिनांक ५ एप्रिल, २०१६ अन्वये शासनाची परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार अहमदनगर जिल्ह्यामध्ये ३९ चारा छावण्या सुरू झाल्या होत्या.

शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट, २०१५ मध्ये खर्चाची मागणी मान्य करताना शेण विक्रीपोटी छावणी चालकांना मिळालेल्या उत्पन्नाची रक्कम विचारात घेऊन तेवढ्या रकमेची मागणी कमी करावी,
अशी तरतूद आहे. त्यानुसार जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, अहमदनगर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार शेणाची किंमत कमी करून कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उरण तालुक्यातील (जि.रायगड) स्त्यांच्या रुंदीकरणासाठी संपादित जमिनीबाबत**

**(१४) ६५१६९ (१६-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) दोन्ही प्रमुख रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी संपादित केलेल्या जमिनीला सिडकोकडून मोबदला देण्यास टाळाटाळ होत असल्याने शेतक-यांनी या भूसंपादनाविरोधात उच्च न्यायालयात माहे ऑगस्ट, २०१६ च्या सुमारास याचिका दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या याचिकेमुळे रस्त्यांचे रुंदीकरण रखडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतक-यांना तातडीने मोबदला देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१७) :**(१), (२) व (३) होय. उरण तालुक्यातील (जि.रायगड) राष्ट्रीय महामार्ग ४ब व राज्य महामार्ग ५४ या दोन प्रमुख रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम सिडकोकडून करण्यात येत नसून मुंबई जे.एन.पी.टी. पोर्ट रोड कंपनी लि. (MJPRCL) या कंपनीमार्फत करण्यात येत आहे.

या रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी लागणाऱ्या खाजगी जमिनींचे भूसंपादनाची कार्यवाही खाजगी वाटाघाटीने उपविभागीय दंडाधिकारी, पनवेल यांचेमार्फत करण्यात येत असून त्याअनुषंगाने नव्याने संपादित केलेल्या खाजगी जमीनींचा मोबदला मुंबई जे.एन.पी.टी. पोर्ट रोड कंपनी लि. (MJPRCL) या कंपनीकडून देण्यात येतो. यासंदर्भात उपविभागीय दंडाधिकारी, पनवेल यांनी दि.१४.६.२०१७ रोजी जासई गावातील लोकांबरोबर बैठक घेतली असून जमिनीचे दर ठरविण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एसटी महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत रक्कम देण्याबाबत**

**(१५) ६५५९६ (१६-१२-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाच्या सुमारे अडीज हजार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरची ग्रॅच्युटी आणि रजा रोखीकरणाची अंदाजे १०० कोटी रुपयांची रक्कम थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचा-यांना नियमानुसार हि रक्कम एक महिन्याच्या आत सुपूर्द करणे बंधनकारक असतानाही महामंडळाच्या आर्थिक स्थितीमुळे हि रक्कम थकीत राहिले असल्याचे कळते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एसटीकडून समाजातील विविध घटकांसाठी सवलतीच्या दारात दिली जाणारी तिकीट सेवेतील सुमारे तीन हजार कोटींची थकबाकी शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती सेवानिवृत्त कर्मचा-यांची थकीत रक्कम देण्याकरिता तसेच एसटी महामंडळाच्या विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) व (२) नाही.
(३) व (४) दि.३१.०३.२०१६ अखेर शिल्लक सवलत मूल्य रु.१३५४.८९ कोटी शासनाकडून महामंडळास येणे प्रलंबित होते. सन २०१६-१७ चे सवलतमुल्य रु.१३५९.२३ कोटी विचारात घेता एकूण रु.२७१४.१२ कोटी प्रलंबित होते. त्यापैकी सन २०१६-१७ मध्ये राज्य परिवहन महामंडळास रोखीने व पुस्तकी समायोजनाद्वारे रु.२१७२.८० कोटी अदा करण्यात आले आहेत.
(५) निधीच्या उपलब्धतेनुसार निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी विहीत वेळेत देण्याबाबत कार्यवाही केली जाते. ग्रॅच्यूईटी व रजा रोखीकरणापोटी आजमितीस कर्मचाऱ्यास देय असलेली कोणतीही रक्कम प्रलंबित नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एसटी महामंडळातील महिला वाहकांच्या समस्यांचा अभ्यास करुन निर्णय घेण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्याबाबत**

**(१६) ६६४०४ (१६-१२-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एसटी महामंडळातील महिला वाहकांच्या समस्यांचा अभ्यास करुन निर्णय घेण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्याचे मा.परिवहनमंत्री यांनी दि.१० ऑगष्ट,२०१६ रोजी प्रशासनाला दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी सदर समितीची नियुक्ती करुन समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे काय तसेच एसटी महामंडळातील महिला वाहकांना नेहमीच भेडसावणा-या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) होय.
(२) राज्य परिवहन महामंडळात कार्यरत असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना गरोदरपणाच्या काळात समस्या जाणून घेण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

सेवाज्येष्ठतेनुसार कामगिरी देताना महिला वाहकांच्या रास्त अडचणी जाणून घेवून त्यांना कामगिरी देण्याबाबतच्या सूचना विभागांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर किना पाळज (जि.नांदेड) या मार्गावर मानव विकास योजनेची बस सुरु करण्याबाबत**

**(१७) ६७९३३ (१६-१२-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर किनी पाळज (जि.नांदेड) या मार्गावर मानव विकास योजनेची एकही बस धावत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे यामार्गावरील मुली आगारातील ठरवून दिलेल्या एस.टी.बसनेच प्रवास करतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामार्गावर बस वेळेवर सुटत नसल्याने मालदरी येथील मुलींना किनी येथील शाळेत जाण्यासाठी सुमारे तीन किलोमीटरची पायपीट करावी लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, येथे बसअभावी शाळकरी मुलींसाठी या मार्गावर मानव विकास योजनेची बस सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) नाही.
(२), (३) व (४) भोकर, किनी पाळज या मार्गावर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या दैनंदिन ०७ फेऱ्या चालनात आहेत. त्यापैकी २ फेऱ्या शालेय वेळेत चालविण्यात येतात. सदर फेऱ्या शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतूकीस पुरेशा आहेत. या मार्गावरील बसेस वेळेवर सुटतात, त्यामुळे मालदरी येथील मुलींना शाळेत जाण्यासाठी पायपीट करावी लागत नाही.
भोकर व उमरी तालुक्याकरीता मानव विकास योजनेंतर्गत १४ बसेस चालविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील ६८ हजार कुटूंब घरापासुन वंचीत असल्याबाबत**

**(१८) ६९१३४ (१६-१२-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या अर्थ व सांख्यिकी अहवालातील माहितीनुसार घरांच्या वाढत्या किंमतीमुळे विदर्भातील तब्बल १७ लाख ५८ हजार कुटूंबांनी वनरुममध्ये संसार थाटला आहे तर ६८ हजार कुटूंब आजही स्वत:च्या घरापासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील सर्वसामान्य नागरिकांना हक्काचे घर असावे यासाठी शासनाने येथील घरांच्या वाढत्या किंमती कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०७-२०१७) :**(१) अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत प्रकाशित झालेल्या "महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी २०१५" या प्रकाशनात जनगणना २०११ नुसार विदर्भात एक खोली असलेल्या कुटूंबाची संख्या १७,५८,८०५ इतकी आहे.
(२) घरांच्या किंमती कमी करण्याकरीता प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये ठराव घेण्यात आला असून ठराव क्र.६७१२ दिनांक १५ डिसेंबर, २०१५ व्दारे म्हाडाच्या प्रचलित किंमती विषयी धोरणातील बांधकाम व विकास खर्चावरील विविध बाबी अंतर्गत आकारण्यात येणाऱ्या शुल्काचे दर कमी करण्यात आलेले आहे. जसे आस्थापना खर्च ५% वरुन ३% करण्यात आला. अनपेक्षित बाबी १% वरुन ०.५% करण्यात आला. आकस्मिक खर्च ५% वरुन २% करण्यात आला. व्यवस्थापकीय खर्च ०.५% वरुन ०.२५% करण्यात आलेला आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गट योजनेतील लाभार्थ्यांना २.५ लक्ष रुपये अनुदान केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून देण्यात येते. अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांकरीता रु.६.०० लक्षचे कर्जाच्या ६.५०% व्याजावर अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण ३१८९ सदनिकांचे काम सुरु झालेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कर्तव्यावर असताना मृत्यू आलेल्या पोलीसांच्या कुंटूंबियांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करणेबाबत

**(१९) ६९८३५ (१७-०१-२०१७). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाहतूक पोलीस शिपाई विलास शिंदे यांचा दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ रोजी झालेल्या मृत्यूनंतर शिंदे कुंटूंबियांना मदत देण्याच्या घोषणा सर्व स्तरांवरून केल्या गेल्या मात्र यापूर्वी कर्तव्यावर असताना खेरवाडी पोलीस ठाण्याचे दत्तू सरनोबत (सन २०१२), जूहू पोलीस ठाण्याचे गजेंद्र परशुराम नाईक (सन २०१५), मनोज रामचंद्र कदम (जुलै २०१५), वांद्रे पोलीस ठाण्याचे अजितकुमार खवळे (सन २०१५) तसेच अजय गावंड(सन २०१४) आदी पोलीसांनी प्राण गमावले असतानाही आजमितीस शासनाने जाहिर केलेली २५ लाखांची मदत व कुंटूंबातील एकाला सरकारी नोकरी तसेच निवृत्तीपर्यंतचे कुंटूंबाला वेतन अशाप्रकारे घोषणा केलेल्या असतानाही शासनाकडून त्यांची पूर्तता न झाल्यामुळे मयत पोलीसांच्या कुंटूंबियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरहू मयत पोलीसांच्या कुंटूंबियांना शासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) दिवंगत दत्तु सरनोबत यांना दिनांक ०७.०६.२०१७ व दिवंगत अजय गावंड यांना दिनांक ०९.०९.२०१६ अन्वये सोयी-सुविधा / नुकसान भरपाई मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच, दिवंगत अजितकुमार खवळे यांचा मुलगा यास दिनांक २२.११.२०१६ रोजी अनुकंपा तत्वावर पोलीस शिपाई या पदावर अनुकंपा तत्वावर नेमणूक देण्यात आली आहे. दिवंगत मनोज कदम यांच्या कुटुंबियाना शासकीय नियमानुसार आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. दिवंगत गजेंद्र नाईक यांचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मागासवर्गीय (अनुसूचित जाती-नवबौध्द) शेतकऱ्यांसाठी देण्यात येणारा निधी अतिअल्प असल्याबाबत

**(२०) ७०४३० (१०-०१-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागासवर्गीय (अनुसूचित जाती-नवबौध्द) शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेसाठीचे अनुदान अतिअल्प असल्याने विहिर व शेततळी मोठ्या प्रामणात अपूर्णावस्थेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील मागासवर्गीयांना विशेष घटक योजनेत देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (३१-०७-२०१७)** :(१), (२) व (३) सन २०१५-१६ पर्यत अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांसाठी विशेष घटक योजना राबविण्यात येत होती. सदर योजनेमध्ये विहीरीचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास रु.१.०० लाख व विहीरी व्यतिरिक्त इतर घटकांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास रु.५०,००० च्या मर्यादेत अनुदान अनुदेय होते.

सदर योजना दिर्घ कालावधीपासून सुरु असल्याने योजनेचे पुनर्विलोकन करुन सन २०१६-१७ पासून सुधारित योजना "डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना" या नावाने राबविण्याचा निर्णय शासनाने दि.५ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर योजनेंतर्गत विहीर या घटकासाठी रु.२.५० लाख एवढे अनुदान अनुज्ञेय आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे (एस.टी.) पालघर, वसई, नालासोपारा आणि अर्नाळा आगारातून सुटणाऱ्या दूर जाणा-या बसेस रद्द केल्याबाबत**

**(२१) ७०८९४ (२७-०१-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे (एस.टी.) पालघर विभागातील ४५ बसेस तसेच वसई, नालासोपारा आणि अर्नाळा आगारातून सुटणाऱ्या लांब पल्ल्याच्या काही बसेस रद्द केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या बसेस रद्द केल्यामुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होणार असून, एसटीच्या उत्पन्नातही मोठी घट होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उपरोक्त आगारातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या पालघर विभागातील लांब पल्ल्याच्या फेऱ्यांचा आढावा घेवून ज्या फे-यांना थेट प्रवासी संख्या कमी आहे अशा ४३ फेऱ्या बंद/खंडीत करण्यात आल्या आहेत.

लांब पल्ल्यांच्या बसेस बंद केल्यामुळे प्रवाशांची कोणत्याही प्रकारची गैरसोय झालेली नसून, स्थानिक पातळीवर शटल सेवा सुरु करण्यात आल्या आहेत. प्रवाशी मागणीनुसार व दिवाळी हंगाम व सुटीच्या हंगामात सदरच्या बंद व खंडीत करण्यात आलेल्या काही फेऱ्या पुन:श्च सुरु करण्यात आल्या आहेत.

लांब/मध्यम पल्ल्यांची नियते बंद केल्यामुळे महामंडळाचे उत्पन्नात मोठी घट झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळामध्ये वाहकांची प्रलंबित अपहार प्रकरणे तडजोड करून निकाली काढण्याबाबत**

**(२२) ७१२५० (१६-१२-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळामध्ये वाहकांची प्रलंबित अपहार प्रकरणे तडजोड करून निकाली काढण्याबाबत दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास उपाध्यक्ष व व्यवस्थापक संचालक यांनी आदेश निर्गमित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार परिपत्रक क्र. २४/२०१६ अन्वये अपहाराच्या विविध प्रकारानुसार राज्यभरातील जिल्हानिहाय निकाली काढलेल्या प्रकरणांची माहिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) होय.
(२) वाहकांची प्रलंबित अपहार प्रकरणे निकाली काढणेबाबत राज्य परिवहन महामंडळाकडून दि.०६.०८.२०१६ रोजी परिपत्रक प्रसारीत करण्यात आले असून, परिपत्रकीय सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीबाबत दरमहा महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयास माहिती अवगत करण्यात येते.

श्रमिक संघटनांनी दिलेल्या निवेदनानुसार सदर परिपत्रकातील नमूद केलेल्या दंडाच्या रकमेबाबत पुनर्विचार व्हावा, याकरीता दि.२६.१०.२०१६ च्या पत्रानुसार तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. स्थगितीपर्यंत राज्य परिवहन महामंडळातील सर्व विभागांकडे ७७८ अर्ज प्राप्त झाले असून, तडजोडीची रक्कम रु.८४,०७,१५०/- जमा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर शहरातील पोलीस वसाहतींची दुरुस्ती करण्याबाबत

**(२३) ७३०३३ (११-०१-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील पोलीस हेडक्वॉर्टर वसाहत तसेच केशव नगर पोलीस वसाहत, कविता नगर पोलीस वसाहत यासह सर्व पोलीस वसाहतीत अनेक नागरी समस्या असून वसाहतींची अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर शहरातील बहुतांशी पोलीस वसाहतीमध्ये अंतर्गत ड्रेनेज लाईनची व्यवस्था नाही, वॉल कंपाऊंड नाही, दिवाबत्ती नाही, अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, पुरेशा पिण्याच्या पाण्याच्या टाक्या नाहीत तसेच कचऱ्यांचे साम्राज्य पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर शहरातील पोलीस वसाहतींच्या पुनर्विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१७) :**(१), (२) व (३) दिनांक १४.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सोलापूर शहरातील खालील नमूद पोलीस वसाहतींमधील अंतर्गत व बाह्य दुरुस्तीच्या कामांसाठी एकूण रु. ६०.६६ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(१) अरविंदधाम - रु.१५.८२, (२) वसंतनगर - रु.११.३३ लक्ष, (३) शामानगर - रु.७.१६ लक्ष (४) किल्ला - रु.१२.८८ लक्ष (५) मंत्रिचंडक - रु.१३.३७ लक्ष.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडकोने विकसित केलेल्या कळंबोली परिसरात मध्यभागी असलेल्या नाल्याची सफाई करण्याबाबत**

**(२४) ७५०७० (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडकोने विकसित केलेल्या कळंबोली परिसरात मध्यभागी असलेल्या नाल्याच्या साफसफाईसाठी पावसाळयापूर्वी दरवर्षी लाखो रूपये खर्च करूनसुद्धा मोठया प्रमाणात साचलेल्या कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाल्यातील कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे मलेरिया, डेंग्यु तसेच साथींच्या रोगाच्या प्रमाणात वाढत होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही. नवी मुंबई सिडको कळंबोली विभागामार्फत पावसाळी पूर्व कामाचा भाग म्हणून तेथील मध्यभागी असलेल्या नाल्यातील गाळ काढण्याची कामे तसेच नाल्यात जमा होणारा कचरा साफ करण्याची कामे स्थानिक ठेकेदारामार्फत वेळोवेळी करण्यात येतात. तसेच आरोग्य अधिकारी, सिडको यांच्या अहवालानुसार कळंबोली विभागात मलेरिया, डेंग्यु व दूषीत पाण्याशी संबंधित इतर रोगांच्या प्रमाणात वाढ झाल्याचे आढळून येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पोलीसांकरिता घरे उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२५) ७५२१७ (२०-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीसांकरिता दोन-तीन वर्षात १ लाख घरे बांधण्याचे नियोजन करुन त्याचा संपूर्ण आराखडा सादर करावा असे निर्देश मा.मुख्यमंत्र्यांनी माहे नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास गृह विभागास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांच्या घराबाबतच्या आराखड्यातील घरे बांधण्याचे काम कोणत्या सक्षम गृहनिर्माण संस्थांना देण्यात येणार आहे तसेच त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली असून कर्जरोखे उभारणी तसेच खाजगी विकासकांच्या माध्यमातून बांधकाम करण्याचा प्रस्तावही शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी किती कालावधी लागण्याचे अपेक्षित आहे तसेच उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत निवासस्थानांच्या प्रकल्पांचे नियोजन करण्यात येत आहे. सदर प्रकाल्पासाठी सन २०१५-१६ मध्ये रु.२२२.४३ कोटी व सन २०१६-१७ मध्ये रु.३१८.८५ कोटी आणि सन २०१७-१८ मध्ये रु.३२५.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून सदर बांधकामासाठी सन २०२० पर्यंतचे नियोजन करण्यात आले असून निधीच्या उपलब्धतेनूसार कामे हाती घेण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर, कळंबोली येथील फेरीवाल्यांसाठी सिडकोमार्फत निश्चित केलेल्या भूखंडाचे वाटप करण्याबाबत**

**(२६) ७५४३० (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर, कळंबोली येथील फेरीवाल्यांसाठी सिडकोमार्फत निश्चित केलेल्या भूखंडाचे वाटप लवकरात लवकर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१७ वा त्यासुमारास मा.आयुक्त व प्रशासक, पनवेल महानगरपालिका व मा.व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्याकडे निवदेनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडकोमार्फत निश्चित केलेल्या भूखंडाचे वाटप न झाल्यामुळे बेकायदेशीररित्या फेरीवाले पदपथाच्या जागेवर आपल्या उपजिवीकेसाठी टपऱ्या व हातगाडया लावत असल्यामुळे रस्त्यावर वाहतुकीची कोंडी व अस्वच्छ परिसरामुळे नागरिकांना त्रास होत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग क्र.२ बाबत शासनाने चौकशी करून सिडकोमार्फत निश्चित केलेले भूखंड फेरीवाल्यांना वाटप करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१७) :**(१), (२) व (३) राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी अंतर्गत सिडको महामंडळाकडून सन २०१४-१५ या कालावधीमध्ये खारघर, कळंबोली, पनवेल,

कामोठे, उलवे, द्रोणागिरी इ. नोडमधील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नन्स यांचेमार्फत करण्यात आले आहे. सर्वेक्षणानुसार फेरीवाल्यांना कागदपत्र पडताळून जागा वाटप व भाडेकरार करण्याचे प्रस्तावित होते.

तथापि, दरम्यानच्या कालावधीत पनवेल महानगरपालिकेची स्थापना झाल्यामुळे रोज बाजारसाठी राखीव ठेवलेले भूखंड पनवेल महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर भूखंडांच्या हस्तांतरणानंतर पनवेल महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोतोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथे खाजगी वाहतूक सुरु असल्याबाबत

**(२७) ७६४७२ (१३-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोतोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) हे सुमारे १६ गावे व १४ वाड्यांची मुख्य बाजारपेठ असुन तेथील बस स्थानकात नेहमीच प्रवाशांची गर्दी असते, परंतु रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभ्या असलेल्या खाजगी वडापच्या गाड्यांमुळे नागरिकांना त्रास होत असून शासनाचे आर्थिक नुकसानही होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने कोतोली येथे सुरू असलेली खाजगी वाहतुक प्रतिबंधीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :**(१) व (२) होय.

(३) कोल्हापूर जिल्हयातील सर्व बसस्थानकावर अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाडयांचे क्रमांक, गाडयांचे प्रकार जिल्हा पोलीस प्रमुख व प्रादेशिक परिवहन कार्यालय यांना कळविण्यात येवून, राज्य परिवहन महामंडळाचे एक अधिकारी व प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या संयुक्त पथकाद्वारे दररोज अवैध प्रवासी वाहनांची तपासणी करुन कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विविध गुन्हयात कारागृहात असलेल्या महिला कैद्यांच्या मुलांच्या सुरक्षा आणि भवितव्याबाबत

**(२८) ७६७०५ (२०-०४-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध गुन्हयात कारागृहात असलेल्या महिला कैद्यांच्या मुलांची सुरक्षा आणि भवितव्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने प्रतिज्ञापत्र सादर करुन महिला कैद्यांच्या मुलांच्या संरक्षणार्थ कोणती उपायोजना केली वा करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१७)** :(१) होय.
(२) मा.न्यायालयाच्या दि. २३.०३.२०१७ च्या आदेशास अनुसरुन महिला बंद्यांच्या कारागृहाबाहेरील व इतर शासकीय/अशासकीय संस्थेमध्ये दाखल केलेल्या मुलांचा तपशील नोंदवून ठेवण्याची कार्यवाही, महिला बंद्यांच्या कल्याण व पुनर्वसनासाठी महिला व बाल कल्याण विभागाच्या समन्वयाने सामाजिक संस्था ठरवून त्याच्यामार्फत कार्य करणे, कारागृहात अंगणवाडी सुरु करणे, महिला बंद्यांसाठी जिल्हा व विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत मोफत कायदेशीर सल्ला देण्याबाबत आवश्यक त्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. महिला बंद्यांना त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यासाठी कॉइन बॉक्स सुविधा पुरविण्यात आली आहे.

यासंदर्भात महिला व बाल विकास विभाग व एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांची एकत्रित कार्यशाळा दि. १९.०५.२०१७ रोजी आयोजित केली होती. याशिवाय गृह विभाग, शासन निर्णय क्र. जेएलएम-१००६/प्र.क्र. १२५/पीआरएस-२, दि. ०४.१२.२००६अन्वये महिला बंदी व त्यांच्या ६ वर्षाखालील मुलांना कारागृहात सुविधा उपलब्ध करणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंचर (ता.आंबेगाव, जि.पुणे) पोलिस स्टेशनकरिता नवीन इमारत बांधण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२९) ७६८९६ (२१-०४-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंचर (ता.आंबेगाव, जि.पुणे) जवळील निघोटवाडी शिवारामध्ये पोलिस स्टेशनची इमारत बांधण्याकरिता जिल्हाधिकारी, पुणे यांनी माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये वा त्यासुमारास १ हेक्टर जागा गृह विभागास उपलब्ध करुन दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंचर पोलिस स्टेशनकरिता नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव पोलिस अधिक्षक पुणे (ग्रामीण) यांच्याकडून गृह विभागाकडे गत दोन वर्षापासून प्रलंबीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबीत असण्याची कारणे काय असून प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.
(२) व (३) पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून सदर कामासाठी नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्यासाठी खाजगी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली असून आरखडे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहन विभागाच्या मंचर बस स्थानक (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथे सांडपाणी पाईपलाईन फुटल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव झाल्याबाबत**

**(३०) ७६९०४ (१७-०४-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन विभागाच्या मंचर बस स्थानक (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथे दोन महिन्यांपासून सांडपाणी पाईपलाईन फुटल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी व डासांचा प्रार्दुभाव झाला आहे व यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.परिवहन मंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानकातील प्रवाश्यांना तसेच स्थानकामागील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना याचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत प्रवाश्यांनी स्थानक नियंत्रक, राज्य परीवहन महामंडळ यांच्याकडे वारंवार तक्रारी करुन सुध्दा कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने संबंधीत अधिका-यावर कोणती कारवाई केली तसेच उक्त प्रकरणी कोणती उपाययोजना केली वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :**(१), (२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या मंचर बसस्थानकामधून ग्रामपंचायतीच्या मुख्य ड्रेनेजला जोडणारी पाईपलाईन माहे डिसेंबर, २०१६ मध्ये तुंबलेली (चोकअप) होती. सदरची पाईप राज्य परिवहन महामंडळाद्वारे तात्काळ साफ करुन सांडपाण्याचा मार्ग पुर्ववत करुन घेण्यात आला असल्यामुळे प्रवाशांना अथवा स्थानिकांना त्रास झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडा विभाग दुष्काळमुक्त करण्यासाठी राज्य पुरस्कृत सिंचन योजना राबविण्याबाबत**

**(३१) ७७१३७ (१५-०४-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगामी तीन वर्षात मराठवाडा विभाग दुष्काळमुक्त करण्यासाठी १०० टक्के राज्य पुरस्कृत सिंचन योजना राबविण्याचा निर्णय दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी झाली आहे काय व यासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात किती तरतूद केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (३१-०७-२०१७) :**(१) मराठवाडा विभागात तीन वर्षाच्या कालावधीसाठी १००% राज्य पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.
(२) सदर योजनेंतर्गत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) या घटकांतर्गत देय अनुदानाप्रमाणे २ हेक्टरच्या मर्यादेत अनुदान देय आहे.
सदर योजनेची अंमलबजावणी सन २०१६-१७ या वर्षापासून सुरु झालेली आहे. तीन वर्षाच्या कालावधीत रु. ३३७ कोटी एवढया रक्कमेचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सन २०१७-१८ या वर्षात सदर योजनेसाठी रु. १४२ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारोळा-चाळीसगाव (जि.जळगांव) येथे प्रवाशांच्या वाढत्या संख्येमुळे जादा बसेस सुरु करण्याच्या मागणीबाबत**

**(३२) ७७३७९ (१३-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा-चाळीसगाव (जि.जळगांव) येथे दिवसेंदिवस प्रवाशांच्या वाढत्या संख्येमुळे जादा बसेस सुरु करण्यात यावी अशी मागणी प्रवाशी व विद्यार्थ्यांकडून केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गाने देवगाव, शिरसमणी, मेहुटेहु या गावासह अनेक गावे असून दुपारी एकच बस आहे त्यांनतर बस नसल्याने विद्यार्थी व प्रवाशांची गैरसोय होत असते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) नाही.
(२) व (३) पारोळा ते चाळीसगांव मार्गे मेहुटेहू, देवगांव फाटा या मार्गावर ६.३० ते १८.०० या वेळेत १४ फेऱ्या दैनंदिन चालनात उपलब्ध आहेत. तसेच पारोळा ते भडगांव मार्गे शिरसमणी या मार्गावर ६.३० ते १९.१५ या वेळेत ११ फेऱ्या तर पारोळा ते देवगांव मार्गावर सकाळी ०७.१० ते १९.३० या वेळेत दिवसभरात ०७ फेऱ्या दैनंदिन चालनात आहेत. यामुळे प्रवाशांची कोणतीही गैरसोय झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील यंत्रमागाधारकांच्या मागण्यांबाबत

**(३३) ७७९४० (०६-०५-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील यंत्रमागाधारकांच्या मागण्यांकरिता कामगार संघटना संयुक्त कृति समितीने दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजीपासून उपोषण सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इचलकरंजी दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजीच्या सुमारास बंद करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या यंत्रमागधारकांच्या मागण्या काय आहेत व या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२५-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही, खर्चीवाल्या/यंत्रमाग मालकांच्या प्रश्नाकरिता इचलकरंकीमधील यंत्रमाग मालकांनी डिसेंबर. २०१६ मध्ये आंदोलन केले होते. त्याकाळामध्ये १० दिवस यंत्रमाग मालकांनीच स्वतः यंत्रमाग बंद ठेवले होते या मध्ये कामगार वा कामगार संघटना सामिल नव्हत्या.

(२) होय.

(३) या संदर्भात कामगार संघटना कृती समितीचे दि.२७/१२/२०१६ रोजीच्या मागण्यांच्या निवेदनाची प्रत या कार्यालयास जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्या दि.०२/०३/२०१७ च्या पत्रासोबत दि.१२/०६/२०१७ रोजी प्राप्त झाले असुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने विकास आयुक्त यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य परिवहन महामंडळाच्या भरतीबाबत

**(३४) ७८०६४ (१३-०४-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राहूल कुल (दौंड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात (एसटी) गत काही वर्षातील सर्वांत मोठी भरती करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आणून मा.परिवहन मंत्री यांनी तसे निर्देश एसटी प्रशासनाला माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटीत १४,२४७ पदांसाठी भरती करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत किती पदांची भरती करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७)** :(१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या सरळसेवा भरती सन, २०१७ अंतर्गत पर्यवेक्षकीय व घटकसंवर्गीय पदांतील एकूण १४२५३ पदांसाठी जाहिरात देण्यात आली होती. उक्त जाहिराताच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या अर्जांच्याआधारे चालक तथा वाहक पदाची लेखी परीक्षा दि.०२.०७.२०१७ रोजी पार पडली असून सहाय्यक (कनिष्ठ) पदाची परीक्षा दि.०९.०७.२०१७ रोजी आयोजित करण्यात आली आहे. उर्वरित पदांच्या परीक्षा आयोजित करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वारगेट, पुणे येथील राज्य परिवहन महामंडळाचे चालक व वाहकांसाठीच्या विश्रांतीगृहाची पुर्ण दुरवस्था झाल्याबाबत

**(३५) ७८०८२ (१३-०४-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वारगेट, पुणे येथील राज्य परिवहन महामंडळाचे चालक व वाहकांसाठीच्या विश्रांतिगृहाची पुर्ण दुरावस्था झाली असून प्राथमिक सुविधादेखील मिळत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विश्रांतीगृहात गादी, पाणी व वीज नाही तसेच स्वच्छतागृहात अस्वच्छता असून दुर्गंधी पसरलेली असते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तदनुसार दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व विश्रांतीगृहात मुलभूत सुविधा पुरवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७)** :(१) व (२) नाही.
(३) व (४) चालक/वाहक विश्रांतीगृहामध्ये पाणी, वीज, सतरंजी या आवश्यक मुलभूत सुविधा याशिवाय फरशी, खिडक्या, रंगकाम इ. कामे करण्यात आली आहेत. विश्रांतीगृहाची दैनंदीन स्वच्छता खाजगी ठेकेदारांमार्फत केली जाते. महिलांसाठी स्वतंत्र विश्रांतीगृह असून त्याठिकाणी मुलभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परिवहन मंडळाचे नाशिक-१ आणि नाशिक-२ आगारांतील स्वच्छकांची पदे गोठविण्यात आल्याबाबत

**(३६) ७८६३८ (१५-०४-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र परिवहन महामंडळाचे नाशिक-१ आणि नाशिक-२ आगारांतील स्वच्छकांची पदे गोठविण्यात आल्याने प्रवाश्यांना व नागरिकांना अस्वच्छ बसेस मधून प्रवास करावा लागत असून अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच याबाबत नागरिकांच्या वारंवार लेखी व मौखीक तक्रारी संबंधित विभागास प्राप्त होत असून सदर गोठविण्यात आलेली स्वच्छकांची पदे पुनर्जिवित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या त्यासुमारास मा. परिवहन मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहुतांशी राज्य परिवहन महामंडळातील मयत कर्मचाऱ्यांच्या विधवा पत्नी व मुलांचा समावेश असलेल्या या कर्मचाऱ्यांना उदर निर्वाहाचे साधन उपलब्ध होण्याकरिता स्वच्छकांची पदे पुनर्जिवित करणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :**(१) नाशिक-१ आणि नाशिक-२ आगारातील स्वच्छकांची पदे गोठविण्यात आली असली तरी नाशिक विभागातील इतर आगारातील एकूण २२ स्वच्छकांची नेमणूक सदर दोन्ही आगारात करण्यात आली असून, त्यांच्याकडून बसेसच्या स्वच्छतेचे काम नियमितपणे करुन घेण्यात येते.

(२) नाही.

(३) बस गाडया स्वच्छतेबाबत महामंडळ स्तरावर नियोजन व पणन खात्यामार्फत एकात्मिक सुविधा व्यवस्थापन सेवा (Facility Management System) याकरीता राज्यस्तरावर बाहयसंस्था/व्यक्तीची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याबाबतची कार्यवाही महामंडळस्तरावर सुरु आहे. बाह्यसंस्थेची निवड होण्यापूर्वी गोठविण्यात आलेली स्वच्छकांची पदे पुनर्जिवित करणे संयुक्तीक ठरणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजुरा (जि.चंद्रपुर) येथील पोलीस वसाहतीची अतिशय दयनीय अवस्था झाल्याबाबत

**(३७) ७९१४६ (२१-०४-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपुर) पोलीस उप विभागांतर्गत येणाऱ्या राजुरा, विरूर (स्टे.) पोलीस वसाहतीची अतिशय दुरवस्था झाली असुन पावसाळयात छतातून पाण्याची गळती होवून घरांचे छत व भिंती कालबाहय झाल्याने तेथील रहिवासांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) पोलीस स्टेशन राजुरा करीता १०१ निवासस्थाने बांधकामास दिनांक १९/११/२०१६ अन्वये मंजूरी देण्यात आली असून महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून सदर कामासाठी नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्यासाठी खाजगी प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे.

---

### नेवासा (जि.अहमदनगर) येथील पोलीस स्टेशनच्या इमारती जीर्ण झाल्याबाबत

**(३८) ७९५१० (२०-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नेवासा (जि.अहमदनगर) येथे विविध शासकीय व अशासकीय कार्यालये असून शहरासह तालुक्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तालुक्यात एकच पोलीस स्टेशन असून सदर इमारत ब्रिटीश कालीन असल्यामुळे अत्यंत जीर्ण झालेली असून त्याचा पोलीस स्टेशनचे कामकाजावर मोठा परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत व पोलीस वसाहतीच्या मागणीचा प्रस्ताव गत अनेक दिवसा पासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१७) :**(१) नेवासा तालुक्यामध्ये एकूण ३ पोलीस ठाणे कार्यरत असून त्यामधील नेवासा पोलीस ठाण्याची इमारत जुनी असल्याने पावसाळ्यात गळती होते. नेवासा येथील पोलीस ठाणे व पोलीस वसाहत येथील नवीन बांधकाम करण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील उजणी जलाशयामुळे पुनर्वसित झालेल्या ३० गावांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) ७९५४५ (२०-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा तालुक्यातील (जि.सोलापूर) उजणी जलाशयामुळे पुनर्वसित झालेल्या ३० गावांना शासनाच्या दिनांक ०२ फेब्रुवारी, १९९७ च्या परिपत्रकानुसार १३ नागरी सुविधा व पुनर्वसन अधिनियम सन १९९९ नुसार १८ नागरी सुविधापैकी किती सुविधा अद्याप पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत,

(२) असल्यास, असून किती सुविधा उपलब्ध करुन देण्याचे प्रलंबित आहे व त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर पुनर्वसित गांवाना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०७-२०१७)** :(१) उजनी प्रकल्पांतर्गत सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुक्यातील ३० पुनर्वसित गावांना देय एकूण ५४० नागरी सुविधांपैकी अद्यापपर्यंत ३८७ सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.
(२) व (३) सदर पुनर्वसित गावांमध्ये अद्याप १५३ नागरी सुविधा पुरविणे बाकी असून, त्यापैकी ११३ नागरी सुविधांची अंदाजपत्रके विभागीय आयुक्त यांचे स्तरावर त्रुटी पुर्ततेसाठी प्रलंबित आहेत. तर उर्वरीत अंदाजपत्रके प्रकल्पयंत्रणेकडून तयार करण्यात येत आहेत.

सदर अंदाजपत्रके विभागीय आयुक्त यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेबाबत पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

**चाळीसगाव तालुक्यात (जि.जळगाव) ४० हजारांवरून अधिक ऊस तोड मजूर काम नसल्याने आर्थिक अडचणीत सापडल्याबाबत**

**(४०) ७९६६४ (२०-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव तालुक्यात (जि.जळगाव) ४० हजारांवरून अधिक ऊस तोड मजूर यंदा उसाचे गाळप लवकर बंद झाल्याने मजुरांना काम नसल्याने आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मजुराबांबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२९-०७-२०१७)** :(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हयातील संपूर्ण पर्यटन स्थळांना जोडणारी बस सेवा सुरू करणेबाबत**

**(४१) ७९७६४ (१७-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील पर्यटन स्थळांना जोडणारी बस सेवा उपलब्ध नसल्याने जिल्हयात येणा-या पर्यटकांची प्रचंड गैरसोय होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आाहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पर्यटन स्थळांना जोडणारी बस सेवा सुरू करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त बस सेवा सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) व (२) नाही.
(३) बुलडाणा जिल्हयातील पर्यटन स्थळांना जोडणारी स्वतंत्र अशी बस फेरी चालनात नसून पर्यटनस्थळी जाणेकरीता बुलडाणा येथून बुलडाणा-शेगांव मार्गावर सकाळी ६.३० ते २१.०० दरम्यान ७७ फेऱ्या, बुलढाणा-लोणार मार्गावर बुलडाणा विभाग व इतर विभागातील दैनंदिन २८ फेऱ्या, मेहकर-लोणार मार्गावर २३ फेऱ्या, सिंदखेड राजा-बुलढाणा येथून सिंदखेड राजा जाण्यासाठी १ परतीची फेरी, मेहकर येथून १३ परतीच्या फेऱ्या, मलकापूर येथून १ परतीची फेरी व शेगांव येथून १ परतीची फेरी अशा दैनंदिन १७ फेऱ्या, सैलानी बाब दर्गा-बुलढाणा येथून सैलानी बाबा दर्गा करीता १४ परतीच्या फेऱ्या व चिखली येथून १२ परतीच्या फेऱ्या अशा दैनंदिन २६ परतीच्या फेऱ्या, तसेच यात्रा/उत्सव दरम्यान बुलडाणा विभागामार्फत जादा फेऱ्यांचे आयोजन केले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### माणगाव (जि.रायगड) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या नविन एसटी बसेसमध्ये प्रथमोपचार पेटया व अग्निशमन यंत्रणा नसल्याबाबत

**(४२) ८००३२ (१७-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माणगाव (जि.रायगड) येथे राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसेसमध्ये ठेवण्यात येणाऱ्या प्रथमोपचार पेटयांमध्ये प्रथमोपचारासाठी आवश्यक साहित्य नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या नवीन गाडयांमध्ये प्रथमोपचार पेटया व अग्निशमन यंत्रणा गायब असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तदनुसार शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०८-२०१७) :**(१), (२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या रायगड विभागातील माणगाव आगारामधील बसेसमध्ये प्रथमोपचार पेट्या प्रथमोपचार सामुग्रीसह ठेवण्यात आलेल्या आहेत.

तसेच राज्य परिवहन वाहनांना आरटीओ पासिंग करतेवेळी औषधांसह प्रथमोपचार पेटी वाहनांमध्ये ठेवणे आवश्यक आहे. त्याशिवाय वाहनाचे आरटीओ पासींग केले जात नाही. त्यामुळे प्रत्येक रा.प. बससोबत आवश्यक औषधांसह प्रथमोपचार पेटी व अग्नीशमन उपकरण ठेवलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नालासोपारा (जि.ठाणे) एसटी आगारातील कर्मचारी व प्रवाशांना वेठीस धरणाऱ्या आगार व्यवस्थापनाची चौकशी करण्याबाबत**

**(४३) ८१३१५ (१७-०४-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (जि.ठाणे) एसटी आगारातील कर्मचारी व प्रवाशांना वेठीस धरणाऱ्या आगार व्यवस्थापनाची चौकशी करावी अशी मागणी प्रवासी संघटनेने मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये उत्पन्नात अग्रेसर असलेल्या उक्त आगाराला सध्या तोटा सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यात लांब पल्ल्याच्या गाडी बंद करणे, शहरातील परिवहन सेवा महापालिकेची असून शहरी एसटी गाड्याही बंद करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासाठी सर्वस्वी आगार व्यवस्थापक याची कार्यपद्धती कारणीभूत असून त्यांची तात्काळ सखोल चौकशी करून कारवाई करण्याची मागणीही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आगार व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) नाही.

(२) राज्य परिवहन महामंडळाच्या नालासोपारा आगारास सन २०१४-१५ मध्ये रु.२५३.३६ लाख, सन २०१५-१६ मध्ये रु.४९.७९ लाख तसेच सन २०१६-१७ मध्ये रु.२४४.६१ लाख इतका तोटा झालेला आहे.

(३) नालासोपारा आगारातून लांब पल्ल्याच्या गाडया सुरु असून प्रवाशांची गैरसोय झालेली नाही. महानगर क्षेत्रात शहर बस वाहतूक सेवा देणे महानगरपालिकेचे कर्तव्य असल्याने राज्य परिवहन महामंडळाकडील शहरी बस वाहतूक महानगर पालिकेकडे हस्तांतरित केलेली आहे. तरीही राज्य परिवहन महामंडळाकडून नालासोपारा आगारातून १४ शहरी नियते चालविण्यात येत आहेत.

(४) नाही.

(५) व (६) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी (जि बीड) येथील राज्य मार्ग परिवहन बसस्थानकावरील महिला प्रसाधनगृह नादुरुस्त असल्याबाबत**

**(४४) ८१४२३ (१७-०५-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन बसस्थानकावरील महिला प्रसाधनगृह नादुरुस्त असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु बसस्थानकावरील महिला प्रसाधनगृहाच्या दुरुस्तीचे, तसेच सदरहू बसस्थानकाच्या नुतनीकरणाचे काम करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) होय.

(२) आष्टी आगारातील प्रसाधनगृह बांधा व वापरा तत्वावर चालविणेसाठी निविदा मागविणेत आल्या होत्या, परंतू त्यास प्रतिसाद मिळाला नाही. तद्नंतर बसस्थानक नुतनीकरण/दर्जावाढ, प्रसाधनगृह बांधकाम इ. कामांच्या नकाशे व अंदाजपत्रक तयार करणेसाठी राज्य परिवहन पॅनेलवरील वास्तुविशारदाची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड तालुक्यातील एसटी बसच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(४५) ८१५४४ (१७-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यातील (जि.पुणे) दौंड, सिद्धटेक, यवत, चौफुला, वरवंड, पाटस, रोटी, हिंगणीगाडा, वासुंदे परिसरात एसटी बसच्या कमतरतेमुळे अनेक विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून विद्यार्थ्यांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावर बसच्या फेऱ्या वाढवाव्यात तसेच बस ची संख्या वाढवावी असे निवेदन लोकप्रतिनिधींनी आगारप्रमुख यांना दिले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुसार बसची संख्या व फेऱ्या वाढविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) नाही.

(२) होय.

(३) व (४) राज्य परिवहन महामंडळाद्वारे माहे सप्टेंबर, २०१६ पासून दौंड-वरवंड, वरवंड-पाटस, पाटस-चौफुला, चौफुला-बारामती अशा जाता-येता ८ नवीन फेऱ्या सुरु करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**भंडारा येथील बसस्थानकावर दोन वर्षापासून बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरु करणेबाबत**

**(४६) ८१८०३ (१७-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा येथील बसस्थानकावर दोन वर्षापुर्वी लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असून त्यातून बसस्थानकावर लक्ष ठेवण्यासाठी आगार प्रमुखांच्या कक्षात लावण्यात आलेले टिव्ही संचसुद्धा चोरीला गेल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरम्यान या बसस्थानकावरुन दोन वर्षाच्या बालकाचे अपहरण करण्यात आले असून सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यामुळे पोलिसांना अपहरणकर्त्याचा शोध घेण्यास अडचण निर्माण झाली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बसस्थानकावर होणाऱ्या चोऱ्या, अपहरण, महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने भंडारा बसस्थानकांवरील सीसीटीव्ही यंत्रणा दुरुस्त करण्यासाठी तसेच आगार प्रमुखांच्या कक्षातील टीव्ही संच चोरीचा शोध घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१७)** :(१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या भंडारा बसस्थानकावर महामंडळ अथवा शासनामार्फत सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आलेली नसून, बसस्थानकावरील रसवंतीगृह वाणिज्य आस्थापना परवानाधारक यांचेद्वारे स्वत:च्या सुरक्षेच्या कारणास्तव रसवंतीगृह सन २०१४ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आली होती. परंतु सदरची सीसीटीव्ही यंत्रणा सन २०१५ मध्ये नादुरुस्त झाली. त्यानंतर परवानाधाक यांनी त्याची दुरुस्ती केलेली नाही. तसेच अपहरणाबाबत पोलीस विभागाद्वारे राज्य परिहवन महामंडळास काहीही कळविण्यात आलेले नाही व बसस्थानाकातून कोणताही टीव्ही संच चोरीला गेलेला नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यातील पोलीस कुटुंबियांच्या विविध समस्यांच्या निराकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीबाबत**

**(४७) ८१९७० (२०-०४-२०१७). डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस कुटुंबियांच्या विविध समस्यांच्या निराकरणासाठी मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर करण्याबाबतची कालमर्यादा निश्चित केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१७)** :(१) राज्यातील पोलीसांच्या कुटुंबियांच्या विविध समस्यांबाबत विचारविनिमय करुन उपाय करण्यासाठी शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पोकुआ-१२१६/प्र.क्र.१२/ शिकाना/पोल-७, दिनांक १०.०१.२०१७, याद्वारे, मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति घटित करण्यात आली आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील एस.टी.बसेसमधून वाय-फाय सुविधा पुरविणेबाबत

**(४८) ८२६०९ (१७-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एस.टी. बसेसमध्ये पुरविल्या जाणाऱ्या सेवा सुविधांचा दर्जा सुधारुन प्रवासी संख्या वाढविण्यासाठी प्रत्येक बसमधून वाय-फाय सुविधा पुरविण्याचा निर्णय घेण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मंत्रिमंडळस्तरावर निर्णय घेण्यात आला आहे काय व कधीपासून सदरहु सुविधेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, बसमधून वाय-फाय सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७)** :(१) होय.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवाशांना मोफत मनोरंजनात्मक सुविधा त्यांच्या वायफाय युक्त स्मार्टफोन मधून विनाइंटरनेट वायफाय हॉटस्पॉटच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. यामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करणारे प्रवासी बसमधील उपकरणांमध्ये साठविलेल्या चित्रपट, संगीत, इ. त्यांच्या वायफाय युक्त स्मार्टफोन मधून विनाइंटरनेट आनंद घेऊ शकतात. परंतु, यामध्ये इंटरनेट ब्राउझिंगची

सुविधा देण्यात आलेली नाही. सदर प्रकल्पाची माहे जुलै, २०१६ पासून अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली असून, राज्य परिवहन महामंडळाच्या बसेमध्ये बसविण्याची कार्यवाही टप्या-टप्याने चालु केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे तांदुळवाडी (ता.परांडा,जि.उस्मानाबाद) येथील काटेवाडी-पाचवड-देऊळगाव ते तांदुळवाडी या मार्गावर बससेवा सुरु करण्याबाबत

**(४९)** *८३५१३* **(१७-०४-२०१७).** **श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तांदुळवाडी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील शालेय विद्यार्थी-विद्यार्थीनीसाठी काटेवाडी-पाचवड-देऊळगाव ते तांदुळवाडी या मार्गावर बससेवा सुरु करण्याची मागणी मा.परिवहन मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :**(१) होय.
(२) तांदुळवाडी ते काटेगांव, पाचवड, देऊळगांव या मार्गाची महामंडळाद्वारे तपासणी केली असता, सदरचा मार्ग राज्य परिवहन वाहतूकीस अयोग्य असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सद्यस्थितीत रस्ता दुरुस्तीचे काम पुर्ण झाल्याशिवाय सदर मार्गावर राज्य परिवहन सेवा सुरु करणे शक्य होत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर येथील राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबत

**(५०)** *८४४९८* **(१५-०५-२०१७).** **श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर येथील राज्य परिवहन महामंडळाची प्रवासी सेवा कोलमडली असून आगारप्रमुखाचे नियंत्रण नसल्याने येथील बसस्थानकाचा कारभार सुरळीत सुरु नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे वारंवार वाहन, चालक गैरहजर रहात असून अनेक बसेस रद्द होत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथे प्रवाशांना तक्रार करण्यासाठी तक्रार पुस्तकही दिले जात नाही याशिवाय स्थानक प्रमुख, जबाबदार अधिकारी भेटत नसल्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुषंगाने प्रवाशांच्या गैरसोयीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व बससेवा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०७-२०१७) :**(१) व (२) नाही.
(३), (४) व (५) राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानक, नियंत्रणकक्ष व वाहकांकडे प्रवाशांसाठी सूचना व तक्रार पुस्तके उपलब्ध आहेत.

तसेच, प्रवाशांची कोणत्याही प्रकारे गैरसोय झालेली नाही. प्रवाशांची गैरसोय झालेली निदर्शनास आल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेवर राज्य परिवहन महामंडळाच्या शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कारवाई केली जाते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.